## प्रेसनोट

दि. २८/०२/२०२५

**अ‍ॅन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून इंदापूर तहसिल कार्यालयातील महिला महसुल सहायक यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | इंदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती. कावेरी विजय खाडे, वय ४८ वर्ष, पद - महसुल सहायक, तहसिल कार्यालय इंदापूर, जि. पुणे. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | २५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | २८/०२/२०२५ |
| सापळा दिनांक | २८/०२/२०२५ रोजी |
| ठिकाण | इंदापूर तहसिल कार्यालय, ता. इंदापूर, जि. पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रेम वाघमोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३०४९५०२) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची मौजे भांडगाव, तालुका इंदापूर येथे सामाईक गट नंबर ३५१ मध्ये वडीलांच्या नावे ३९ गुंठ्ठे जमीन असून, सदर जमिनीस रस्ता मिळण्याकरता तहसिलदार इंदापूर यांचेकडे अर्ज केला होता. सदर अर्जावर झालेल्या सुनावणी बाबतचा अंतिम आदेश तयार करुन तहसिलदार इंदापूर यांची अंतिम आदेशावर सही घेण्यासाठी लोकसेवक कावेरी खाडे यांनी तक्रारदार यांचेकडे २५,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. २८/०२/२०२५ रोजी लोकसेवक कावेरी खाडे यांची इंदापूर तहसिल कार्यालयात पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक कावेरी खाडे यांनी तक्रारदारांकडे वरील नमुद काम करण्यासाठी २५,००० रुपयाची मागणी करुन, ती लाच रक्कम आज रोजी त्यांच्या सरकारी कार्यालयात तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध इदापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(अनिल कटके)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner